दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २३९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२९ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## बेळगाव कोर्टाचे खा.संजय राऊत यांना समन्स

**दै.रायगड नगरी । मुंबई**

काही दिवसांपूर्वीच तुरुंगातून जामिनावर बाहेर आलेले ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर पुन्हा अटकेची टांगती तलवार लटकत आहे. संजय राऊत यांना प्रक्षोभक भाषण केल्याप्रकरणी बेळगाव कोर्टाने समन्स बजावले आहे. तसेच त्यांना १ डिसेंबरला न्यायालयात हजार राहण्याचे आदेश या समन्समध्ये देण्यात आले आहे. बेळगावात ३० मार्च २०१८ रोजी केलेल्या भाषण प्रकरणी हे समन्स बजावण्यात आले आहे.

बेळगाव कोर्टाने पाठवलेलं समन्स आणि त्यावेळी केलेल्या भाषणावर संजय राऊत म्हणाले आहेत की, सीमा भागातील बांधवांवर कर्नाटक सरकारने हल्ले केले किंवा कायद्याचा बडगा दाखवून त्यांना तुरुंगात टाकलं, तर महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटतील. यामध्ये प्रक्षोभक काय आहे? हे मला कळलं नाही, असं ते म्हणाले आहेत. ते म्हणाले, २०१८ मध्ये केलेल्या भाषणाची दखल घेऊन मला त्यांनी आता कोर्टात हजर राहण्यास सांगितलं आहे. याचा अर्थ मी तिथे कोर्टात जावं आणि कोर्टात गेल्यावर माझ्यावर हल्ला व्हावा, अशी माझ्याकडे माहिती असल्याचं ते म्हणाले आहेत.

## पनवेल अर्बन बँक निवडणुकीत महाविकास आघाडीची बाजी

# पैसा पसरला तरीही भाजप घसरला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल अर्बन बँकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या एकजुटीमुळे भाजप आणि मित्र पक्षांनी केलेल्या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत भाजपने पैशाचा पाऊस पाडून देखील महाविकास आघाडीने १३ च्या १३ जागी महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी करून भाजप आणि मित्र पक्षाला पाणी पाजले आहे. या विजयावर प्रतिक्रिया देताना शिवसेनेचे आणि महाविकास आघाडीचे अध्यक्ष असलेले बबनदादा पाटील हे म्हणाले की ही तर पनवेल महापालिकेच्या निवडणुकीच्या विजयाची नांदी आहे, ये तो झाँकी है और बहोत कुछ बाकी आहे, अशी प्रतिक्रिया दिली.**



दि.पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी रविवारी (दि. २७ नोव्हेंबर) मतदानप्रक्रिया संपन्न झाली. यासाठी व्ही. के. हायस्कूल येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीचा निकाल दुसर्या दिवशी म्हणजेच सोमवारी (दि.२८ नोव्हेंबर) लागला. गेल्या ३० वर्षांपासून पनवेल अर्बन बँकेवर शेकापची सत्ता राहिली आहे.

यावेळी महाविकास आघाडीविरोधात भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना युती अशी लढत पाहायला मिळाली. महाविकास आघाडीने प्रथमच पनवेलमध्ये निवडणूक लढवल्याने ही निवडणूक निश्चितच चुरशीची होणार असे चित्र निर्माण झाले होते. त्यामुळे पनवेलच्या सर्व नागरिकांचे या निवडणुकीकडे लक्ष लागले होते. भारतीय जनता पक्ष विरूद्ध शेकाप, उध्दव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, आणि काँग्रेस यांच्या महाविकास आघाडी ने पनवेल मधील बहुचर्चित पनवेल अर्बन बँकेचे निवडणूक प्रतिष्ठेची केली होती.

एकूण १३ जागांसाठी पनवेल अर्बन बँकेची निवडणूक संपन्न झाली असून यात सर्वसाधारण आठ, महिला प्रतिनिधी दोन आणि अनुसूचित जाती जमाती, इतर मागासवर्गीय आणि भटक्या विमुक्त जमाती प्रवर्गासाठी प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे. पनवेल अर्बन बँकेवर महाविकास आघाडी ने आपले वर्चस्व राखले असुन १३ पैकी १३ जागांवर दणदणीत विजय संपादन केला आहे.

### विजयी उमेदवार

**सर्वसाधारण - दिलीप कदम, अनिल केणी, राजेश खानावकर, प्रविण जाधव, जनार्दन पाटील, ज्ञानेश्वर बडे, बी पी म्हात्रे, हितेन शहा. महिला राखीव- विद्या चव्हाण, विमल गायकवाड. अनुसूचित जाती जमाती- अरविंद सावळेकर, इतर मागासवर्गीय- बाबुराव पालकर, भटक्या विमुक्त जमाती प्रवर्ग- पांडुरंग भाग्यवंत**

### १३ पैकी १३ जागांवर महाविकास आघाडीचा दणदणीत विजय

महाविकास आघाडीमध्ये फुट पाडण्याचा भाजपने प्रयत्न जो केला होता तो आम्ही हाणून पाडला असून अशा प्रकारची फुट पाडण्याचा कदापि प्रयत्न भाजपच्या स्थानिक नेत्यांनी करू नये, अन्यथा अर्बन बँकेची पुनरावृत्ती प्रत्येक ठिकाणी करून दाखवू असा विश्वास व्यक्त केला.
**- आ.बाळाराम पाटील**

या निवडणुकीत एकप्रकारे प्रतिष्ठाच पणाला लागलेली होती. भाजपने या निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभूत करण्यासाठी अनेक प्रयत्न केले मात्र हे चित्र सुज्ञ जनतेने खोटे ठरवले. पनवेल अर्बन तो बस झाकी है, अभी महापालिका बाकी है. येणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीचाच विजय निश्चित होईल.
**- अभिजीत पाटील, जिल्हाध्यक्ष पनवेल शहर काँग्रेस**

या विजयातून महाविकास आघाडीची एकजूट सर्वांनी अनुभवली. त्यामुळे आगामी सर्व निवडणूका महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढू आणि जिंकू सुद्धा अशी खात्री आहे. पनवेलच्या फसव्या सत्ताधाऱ्यांना जनतेने पायउतार करण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात केल्याची ही नांदी आहे. सर्व मतदार आणि सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानतो.
**- सुदाम पाटील, प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

## एकतर्फी प्रेमातून महाविद्यालयीन विद्यार्थीनीवर हल्ला ; आरोपी फरार

**दै.रायगड नगरी । महाड**

एकतर्फी प्रेमातून एका १६ वर्षीय विद्यार्थीनीवर प्राणघातक हल्ला करण्याची घटना आज (सोमवारी ) महाड येथे घडली. या प्रकरणातील आरोपी फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात अकरावी वाणिज्य शाखेत शिकणारी ही १६ वर्षीय विद्यार्थीनी सोमवारी सकाळी महाविद्यालयासमोरील पादचारी पुलावरुन महाविद्यालयात जात होती. आरोपी सारळ शिंदे (रा. दहिवड ता. महाड, सध्या कल्याण) याने तिला या पुलावर गाठले आणि हातातील फुटक्या बाटलीने तिच्या मानेवर, हनुवटीवर, चेहेऱ्यावर वार केले. या तरुणीने आरडाओरडा केल्यानंतर तो पळून गेला. एकतर्फी प्रेमातून त्याने हा हल्ला केल्याची माहिती शहर पोलिसांच्या सुत्रांनी दिली. जखमी तरुणीवर महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेची माहिती मिळताच प्रभारी पोलीस अधिक्षक श्री. स्वामी, महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक मिलिंद खोपडे, उपनिरिक्षक रेखा जगदाळे घटनास्थळी दाखल झाले. पिडीत तरुणीने दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपी सारळ शिंदे याच्याविरुद्ध भा.दं.वि. कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या शोधार्थ पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत. या प्रकरणी अधिक तपास उप निरिक्षक रेखा जगदाळे करित आहेत.

## खारघर वसाहतीच्या चतु:सिमेपर्यंत दारुबंदीचा निर्णय

### पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांचा निर्णय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पुर्वाश्रमीचे खारघर ग्रामपंचायत यांनी २००५ साली संपूर्ण खारघर गाव व कॉलनीमध्ये दारुबंदी करण्यात यावी असा ठराव पारीत केला होता. पुर्वाश्रमीचे खारघर ग्रामपंचायतीचा हा ठराव महानगरपालिकेने अधिक्रमित केला नाही. त्यामुळे हे लोकोपयोगी धोरण व्यपगत झालेले नाही. त्यामुळे सदर पूर्वाश्रमीच्या खारघर ग्रामपंचायतीमधील क्षेत्रामधील किरकोळ व घाऊक मद्यविक्री बंदीच्या धोरणाबाबत आज झालेल्या प्रशासकिय महासभेमध्ये मंजूरी देण्यात आली.**

आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आज प्रशासकिय महासभा मुख्यालयात संपन् झाली. यावेळी उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त कल्पिता पिंपळे, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय जगताप , सहाय्ययक आयुक्त डॉ.वैभव विधाते, सचिव तिलकराज खापर्डे महापालिका अधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिकेची स्थापना ०१ ऑक्टोबर २०१६ रोजी झाली तेव्हा पुर्वाश्रमीची पनवेल नगर परिषद व २३ ग्रामपंचायतीमधील २९ महसुली गावांचा महानगरपालिकेत समावेश करण्यात आला आहे. यामध्ये खारघर ग्रामपंचायतीचाही समावेश आहे. पुर्वाश्रमीचे खारघर ग्रामपंचायतीने २००५ साली संपूर्ण खारघर गाव व कॉलनीमध्ये दारुबंदी करण्यात यावी असा ठराव पारीत केला होता.

सद्यस्थितीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, व्यापारी संघटना, स्वयंसेवी संस्था व नागरिक यांनी पूर्वाश्रमीचे खारघर ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये दारूबंदी करणेबाबत पालिकेला निवेदन दिले आहे. खारघर ग्रामपंचायतीने दारूबंदीबाबत केलेल्या ठराव महापालिकेने अधिक्रमित केला नसल्याने ग्रामपंचायतीचे लोकपयोगी धोरण व्यपगत होण्याचा प्रश्न येत नसल्याने सदर धोरणास प्रशासकिय महासभेत या विषयास मान्यता दिली आहे.




आज झालेल्या ठरावानुसार महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ‘अ’ मधील पुर्वाश्रमीचे खारघर ग्रामपंचायत क्षेत्रसिमीत खारघर ग्रामपंचायत पुर्व बाजू- खारघर से.१७ संपूर्ण, से.१६ पूर्व बाजू (खाडी लगत), सायन पनवेल हायवेवरील पूल, ओमकार एम्पायर इमारत से.१०, मानसरोवर रेल्वे ब्रिज, तळोजा खाडी ते पनवेल महानगरपालिका हद्दीपर्यंत, खारघर ग्रामपंचायत पश्चिम बाजू - पनवेल महानगरपालिका खारघर गावाची पश्चिम दिशेकडील महसुल हद्द, खारघर टेकडी, खारघर हिल, फणसवाडी, खारघर व्ह्युव पॉईंट, चाफेवाडी, खारघर ग्रामपंचायत उत्तर बाजू- चाफेवाडी गाव, खारघर टेकडी ते खारघर व्ह्युव पॉईंट, गोल्फ कोर्स रोडने सी.जे.एम.शाळा सिअमय इमारत ते ग्राम विकास भवन, खारघर से.०६, भुखंड क्र.८,१३,१४ से. २१,

.../२




## मानसरोवर रेल्वे स्थानक परिसरात ३४ दुचाकींना आग



**दै.रायगड नगरी । पनवेल**

हार्बर रेल्वे मार्गांवरील मानसरोवर रेल्वे स्थानकाबाहेरील परिसरात गवताला आग लागून परिसरात उभ्या असलेल्या ४२ पैकी ३४ दुचाकी आगीच्या भक्षस्थानी पडल्या आहेत. सव्वापाच वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेची माहिती मिळताच कळंबोली अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले असून ते आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

आगीत किती दुचाकींचे नुकसान झाले याची माहिती अद्याप हाती लागली नसून, चार ते पाच दुचाकीचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

स्थानक परिसरात प्रधानमंत्री आवास योजनेचे काम सुरु असल्याने स्थानक परिसरातील वाहनतळ बंद असल्याने हार्बर मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नाईलाजाने परिसरातील मोकळ्या मैदानाचा वापर वाहन उभी करण्यासाठी करावा लागतो. आगीची झळ पोहचलेल्या दुचाकी रेल्वे प्रवाशांच्या असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेची माहिती मिळताच कामोठे पोलीस ठाण्याचे पथक सुद्धा घटनास्थळी रवाना झाले होते.





# जासई उड्डाणपुलाचे आठ वर्षांपासून रखडलेले काम पूर्ण होण्यास 2023 उजाडणार

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण, पनवेल व नवी मुंबई शहराला जोडणाऱ्या जासई येथील उड्डाणपुलाचे काम आठ वर्षांपासून रखडले असून येत्या मार्च २०२३ ला हा पूल प्रवासी वाहतुकीसाठी खुला केला जाणारा असल्याची माहिती भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा या मार्गावरील प्रवासी व वाहतूकदार यांनी आनंद व्यक्त केला आहे.वाहतूक कोंडी मधून प्रवाशांची सुटका करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा कडून जासई येथील दास्तानफाटा ते शंकरमंदीर असा १.२ किलोमीटर लांबीच्या उड्डाणपुलाची उभारणी करण्यात येत आहे.

उरण पनवेल व नवी मुंबई या मार्गावरून रोजची प्रवासी वाहतूक होत आहे. मात्र या मार्गावर उरण ते जासई तसेच गव्हाण फाट्यापासून पुढील रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. मात्र जासई नाका ते गव्हाण दरम्यानच्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम मागील आठ वर्षे रखडले आहे. रस्त्याच्या कामामुळे जासई ते गव्हाण या दीड किलोमीटर च्या मार्गावर प्रवाशांना दररोज वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. यामध्ये नवी मुंबई, पनवेलला शिक्षणासाठी ये-जा करणारे विद्यार्थी, कामगार तसेच व्यावसायिक यांना देखील वाहतूक कोंडीमुळे त्रास सहन करावा लागत आहे.

वाहतूक कोंडी मधून प्रवाशांची सुटका करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा कडून जासई येथील दास्तानफाटा ते शंकरमंदीर असा १.२ किलोमीटर लांबीच्या उड्डाणपुलाची उभारणी करण्यात येत आहे. मात्र हा उड्डाणपूल मागील आठ वर्षापासून रखडला आहे. या उड्डाणपुलाच्या कामाच्या दरम्यान एक अपघात ही झाला होता. जासई उड्डाणपुलाचे काम येत्या मार्च २०२३ पर्यंत पूर्ण होणार अशी माहिती भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचआय) चे अधिकारी यशवंत घोटकर यांनी दिली आहे.




# खारघरमधील रस्त्यांची दुरवस्था; रस्ते दुरुस्तीच्या कामाकडे पालिका आणि सिडकोचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहतीमधील रस्त्यांवर अनेक ठिकाणी खड़े पडलेले असून काही भागांत डांबरही निघालेले आहे. रस्ते दुरुस्तीबाबत विचारणा केली असता, सिडको आणि पालिका एकमेकांकडे बोट दाखवत असल्यामुळे या रस्त्यांचे वाली कोण? असा प्रश्न खारघरवासीयांना पडला आहे.

सिडकोने खारघर शहराची निर्मिती करून २० वर्षांहून अधिक काळ झाला आहे. त्या वेळी सिडकोने तयार केलेल्या रस्त्याची सद्यस्थितीत दयनीय अवस्था झाली आहे. सिडकोकडून अनेक वेळा मलमपट्टी करण्यात आली. मात्र, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यावर खड्डे कमी होण्याऐवजी वाढत आहेत. पाच वर्षांपूर्वी पनवेल पालिका अस्तित्वात आल्यानंतर खारघरचा पालिकेत समावेश करण्यात आला. त्यानंतर मात्र सिडकोने खारघरच्या विकासाकडे दुर्लक्ष केले. हळूहळू सर्व सुविधा पालिकेकडे हस्तांतरीत करण्यात येत आहेत. सिडकोकडून किरकोळ कामे केले जाईल, असे सांगण्यात आले.

मात्र, खारघरच्या समस्येत भर पडत आहे. पावसाळ्यात येथील रस्त्यांवर मोठ्याप्रमाणात खड्डे पडलेले होते. खड्डयात पडून किरकोळ अपघाताच्या घटनेत वाढ झाल्यामुळे सिडको आणि पालिका या दोन्ही प्रशासनाकडून तात्पुरती मलमपट्टी करत खड्डे दुरुस्ती करण्यात आली. मात्र, पावसाळा संपताच रस्त्याचे डांबरीकरण केले जाईल, असे सिडको अथवा पालिकेकडून सांगण्यात आले. सध्या खारघरमधील रस्त्यांची दुरवस्थाझाली असून, रस्त्यावर उडणारी धूळ आणि खड्ड्यांमुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पालिका आणि सिडको रस्ते दुरुस्तीच्या कामाकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे खारघरमधील रस्त्याला वाली कोण? असा प्रश्न खारघरवासीयांकडून विचारला जात आहे. याविषयी सिडकोच्या खारघर कार्यालयातील अधिकाऱ्याकडे विचारणा केली असता, खारघरच्या रस्त्याची जबाबदारी पनवेल महापालिकेची असल्याचे सांगितले.

# ओव्हरलोड वाहतुकीचा कोळसा रस्त्यावर

## गोंडघर फाटा, दिघी रस्त्यावर पसरतोय कोळशाचा सडा

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी पोर्ट मधील ओव्हरलोड व अवजड वाहतूक ही सद्यस्थितील सर्वात मोठी समस्या बनली आहे. रस्त्यावर पडणाऱ्या कोळशाच्या ढिगाऱ्यांमुळे ओव्हरलोड वाहतूक प्रवाशांसाठी अत्यंत धोकादायक व जीवघेणी ठरत आहे.

दिघी पोर्ट येथून वडवली - मार्गे माणगावकडे होणाऱ्या अवजड वाहनांतुन नियमितपणे क्षमतेपेक्षा अधिक मालवाहतुकीमुळे सतत लहानमोठ्या अपघाताच्या संख्येत वाढ झाली आहे. आता या मार्गावरील सुसाट रस्त्यांनी जाताना अधूनमधून नागमोडी वळणांवर वहानचालकांनी वेगाची मर्यादा ओलांडल्याने कोळसा, लाईन स्टोन अशा अनेक मालाचा सडा रस्त्यावर दिसत आहे. पडलेल्या कोळशाच्या तुकड्यांवरून दुचाकी, तीन चाकी



रिक्षा घसरत आहेत. तर वाहन जाऊन बनणाऱ्या पावडरची परिसरात दुर्गंधीचा त्रास होत असल्याचे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे.

दिघी ते माणगाव या अंतरात माल वाहतूक होत असलेल्या रस्त्यावर अनेक वळणं तसेच घाट मिळत आहेत. मात्र याचा विचार नझाल्याने चालकाकडून वाहनावरील नियंत्रण सुटत आहे. त्यामुळे रस्त्यावरील प्रवाशांचा सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

माणगाव - वडवली - दिघी या मार्गावरील वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच वाढते अपघात रोखण्यासाठी प्रादेशिक वाहतूक परिवहन विभागाच्या अधिकार्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे; मात्र अवजड वाहतूक ही होतच आहे.

वाहनातील मोज माप एक हजार किलोचे एक टन असे असते. त्यानुसार सहा चाकी वाहनाला १० टनाची क्षमता असून, माल असतो १६ टन. त्याहून मोठया दहा चाकी गाडीला २० टनाची क्षमता असली तरी मात्र, माल असतो २५ टन आणि बारा चाकी ट्रकमध्ये २५ टनाच्या परवाण्यावर माल भरला जातो ३० टन.

# रायगड जिल्हा कोकणस्थ तेली समाज संघटनेची समाज एकजुटीसाठी कोलाड येथे सभा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

रायगड जिल्हा कोकणस्थ तेली समाज सेवा संस्थेच्या वतीने तेली समाज संघटन बांधणीसाठी ग्रामीण विभाग समाज बांधवांच्या उपस्थितीत रविवार दि.२७ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन ते सहा वाजता, आंबेवाडी ग्रामपंचायत कार्यालय कोलाड तालुका रोहा येथे विशेष सभा झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महेंद्र वाचकवडे यांचे हस्ते दिप प्रज्वलन करुन संत शिरोमणी संताजी महाराज प्रतिमेस पुष्पमाला अर्पण केली. यावेळी रोहा,अलिबाग, श्रीवर्धन, माणगांव, महाड वेळास येथुन अनेक तेली समाजबांधव उपस्थित होते. संघटनेची ध्येय धोरणे, एकजूट आदी विषयांवर चर्चा झाली. तेली समाज जिल्ह्यात एकजुट रहावा, संघटनात्मक भेदाने तो विभागला न जाता एकत्रच असावा, कारण शेवटी आपण सर्व तेली समाजाचेच घटक आहोत.

नातीगोती व सगेसोयऱ्या संबधांनी एकत्र बांधले गेलो आहोत. त्यामुळे कोणताही प्रांत, जिल्हा असा भेदभाव न करता तेली म्हणुन एकत्र संघटना संलग्न होऊनच कार्य करावे. अशा प्रकारची स्पष्ट मतं समाज बांधवानी मांडत या सभेत आपले विचार व्यक्त केले. याला कारण महाराष्ट्र प्रांतिक तेली समाज संघटनेने रायगड जिल्ह्यातील सुधागड पाली येथे येत्या ११ डिसेंबर २०२२ रोजी तेली समाज मेळाव्याचे भव्य आयोजन केले असुन संघटनेच्या माध्यमातुन उपक्रम राबविताना जिल्ह्यातील सर्वच तेली समाज बांधवांना कार्यक्रमास येण्याचे आवाहन केले आहे.

दोन संघटनांमुळे समाज बांधवामध्ये सध्या संभ्रमाची स्थिती निर्माण होत आहे. दोन्ही समाज संघटना आपल्याच आहेत. कोणी दूराग्रह निर्माण करीत असतिल तर त्यांना वेळीच समज देऊन संघटनेच्या जाणकार पदाधिकाऱ्यांनी उच्च स्तरावर एकत्रीत येऊन हा प्रकार सामंजस्याने मिटवावा. असे मत सर्वच समाज बांधवांनी व्यक्त केले आहे. सन १९३७ पासून कार्यरत असलेल्या जिल्ह्यातील स्थानिक मुळचे कोकणस्थ तेली समाज संघटन मजबूत करण्यात त्या काळी काही अडचणी होत्या परंतु आता नव्याने हे संघटन मजबूत करण्यासाठी सर्व तेली समाज बांधव, महिला, युवावर्ग यांना एकत्रित करून आणखीन चांगले उपक्रम व मेळावे आयोजित करून जिल्ह्यात सर्वदूर जोमाने कार्य करण्याचा संकल्प करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कोलाडचे महेंद्र रामशेट वाचकवडे यांची निवड करण्यात आली होती तर कार्यक्रम सफल करण्यासाठी सौ. कांचन महेंद्र वाचकवडे माजी सरपंचा कोलाड तसेच हेमंत तार्लेकर यांनी विशेष मेहनत घेतली. मुंबई ठाणे येथून आलेले रा.जि.को.तेली समाज सेवा संस्थेचे अध्यक्ष-संतोष राजाराम रहाटे, सचिव-गजानन दत्ताराम शिंदे यांनी योग्य मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी व कार्यकारी सदस्य तसेच रोहा, अलिबाग दोन तालुक्यातील विशेषतहा बेलोसी येथुन समाज बांधव उपस्थित होते. संघटनेच्या नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष व पदाधिकारी यांची निवड करुन त्यांना नियुक्तीपत्रही प्रदान करण्यात आली.



# वाहने पार्किंगमुळे वाहतुकीस अडथळा ; प्रवाशांबरोबर, नागरिकांच्या डोक्याला ताप

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपालिकेच्या नियोजन शून्य कारभारामुळे शहरात वाहतूक कोंडीच्या समस्या उद्भवत आहेत.शहरात असणारे अरुंद रस्ते आणि त्या रस्त्यांवर दुतर्फा पार्किंग करून ठेवलेली वाहने भाजी फळ विक्रेत्यानी रस्त्यावर लावलेल्या हातगाड्या यामुळे बाजारपेठेत सततची वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून सर्व सामान्य जनतेला, प्रवाशी नागरीक याना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

उरण शहर छोटेसे शहर आहे. मोटारसायकल वरून फक्त १० मिनिटांत उरण शहर फिरून होऊ शकत एवढेच आहे. उरण शहरात जरी कचरा समस्या मार्गी काही अंशी मार्गी लागली असली तरी, शहरातील अनधिकृत बांधकामे, पदपथ वरील अनधिकृत बांधकाम तसेच रस्त्यावरील भाजी फळे विक्रेते अशा समस्यांनी उरण शहर चर्चेत आहे.



उरण शहर तालुक्याचे ठिकाण असल्याने तहसिल कार्यालयात पोलीस ठाण्यात विविध सरकारी कार्यालयात नागरिकांचे रेलचेल सततची असले. पार्किंग ची व्यवस्था नसल्याने अनेक वाहने रस्त्यावर पार्किंग करून ठेवली जाते.तसेच व्यापाऱ्यांकडून अगोदरच फुटपाथ गिळंकृत करण्यात आले असताना दुकानाच्या समोर रस्त्यावरच प्लास्टिक किंवा लाकडाचे पलेट ठेवले जात आहेत त्यामुळे ही वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. उरण शहरात अगोदरच अरुंद रस्ते आहेत आणि त्याच्यात छोटी मोठी वाहने रस्त्यावर पार्किंग करून ठेवली जातात. उरणचे प्रवेश द्वार असणाऱ्या कोट नाक्या पासून राजपाल नाक्या पर्यत दुतर्फा वाहने पार्कींग करून ठेवली जात आहेत. आनंद नगर पासून पेन्शन पार्क पर्यत वाहने पार्क करून ठेवली जात आहेत.त्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे.

नगरपालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांनी दोघांनीही या वाहतूक कोंडी कडे लक्ष केंद्रीत केले तर नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही एखादया वाहन चालकाला वाशी वरून येण्यास ३० मिनिटे लागतात मात्र उरणच्या प्रवेश दारातुन प्रवेश करताच त्या वाहन चालकाला अर्धा ते पाऊण तास वाहतूक कोंडी चा सामना करावा लागत आहे.एखादा विद्यार्थीचे शिक्षण ही या वाहतूक कोंडी मुले बुडत आहे.आंबूलन्स ही अनेक वेळा शहरात वाहतूक कोंडी मध्ये अडकून पडल्याची घटना घडली आहे. पोलीस प्रशासन आणि पालिका प्रशासन एक मेकांकडे बोड दाखवीत असल्याने ही समस्या उद्भवली आहे. त्यामुळे या वाहतूक कोंडी कडे प्रशासनाने जातीने लक्ष घालून नागरीकांना होणाऱ्या या वाहतूक कोंडीच्या त्रासातून मुक्त करावे अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे गरुड झेप अंतर्गत पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा येथे उप विभागीय अधिकारी अमित शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच पोलीस भरतीवर आधारीत गरुडझेप अंतर्गत विशेष प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले.

याप्रसंगी रोहा येथील द्रोणाचार्य करिअर केंद्राचे तज्ज्ञ मार्गदर्शक स्वप्नील सकपाळ, तहसीलदार समीर घारे, पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे, निवासी नायब तहसीलदार गणेश तेलंगे, महसूल तहसीलदार धर्मराज पाटील, मंडळ अधिकारी रविंद्र उभारे, मंडळ अधिकारी एस. के. शहा, म्हसळा तलाठी कैलास पाटील, अंजुमन हायस्कूल आणि जुनिअर कॉलेज चे प्राचार्य मोहंमद तांबे,, डॉ. मुबशीर जमादार आदि मान्यवर उपस्थित होते. तालुक्यातील एकूण १८० प्रशिक्षणार्थिनी या शिबिराचा लाभ उठवीला.स्वप्नील सकपाळ यांनी प्रशिक्षणार्थिना पोलीस भरती विषयी मार्गदर्शन करून त्यांना योग्य मार्गदर्शन केले. त्याच बरोबर परीक्षेचे अर्ज ऑनलाईन भरणे, पुस्तके उपलब्ध करून देणे आणि पोलीस क्षमता चाचणी याबाबतही मार्गदर्शन केले.उपविभागीय अधिकारी अमित शेडगे, तहसीलदार समीर घारे आदि मान्यवरांनी मार्गदर्शन केले. पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी सांगितले कि विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षण घेऊन चालणार नाही तर त्यांनी स्पर्धा परीक्षेत सहभाग घेणे अत्यावश्यक आहे. एकदा अपयश आले तर निराश न होता जिद्द सोडू नये. मोबाईल हे केवळ करमणूकीचे साधन म्हणून न वापरता गुगल च्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेबाबत विविध माहिती घेणे अत्यावश्यक आहे. पोलीस भरती बाबत हवे ते मार्गदर्शन देण्याचे आश्वासन सोनवणे यांनी दिले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## खारघर वसाहतीच्या चतु:सिमेपर्यंत दारुबंदीचा निर्णय

भुखंड क्र.८५ से.२१, निलमकुंज भुखंड क्र.१५१ (प्रस्तावित महापौर बंगला), खारघर से. २०, , प्लॉट नं.८० ते प्लॉट नं. ८५,७७,७७ए,५७,५६,५२, ५१, भुखंड क्र.८६ ते ९५ से.१९, भुखंड क्र. ११ब, ११अ, भुखंड क्र. २३४ ते २४३, खारघर ग्रामपंचायत दक्षिण बाजू- मानसरोवर, खारघर रेल्वे ब्रिज, तळोजा खाडीने पनवेल महानगरपालिका हद्दीपर्यंत खारघर गावाची दक्षिणेकडील महसुल हद्द या चतु:सिमा दर्शविण्यात आलेल्या आहेत. या क्षेत्रासाठी सर्व प्रकारच्या किरकोळ व घाऊक मद्यविक्री व साठा करण्यास परवानगी असणार नाही.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला गांभिर्य नाही-मुंबई उच्च न्यायालयाची तीव्र नाराजी

## मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी २३ डिसेंबरपर्यंतची मुदत

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खड्ड्यांबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला कोणत्याही प्रकारचे गांभिर्य दिसून येत नसून न्यायालयाने निर्देश देऊनही खड्डे पुर्णपणे बुजविण्यात आले नसल्याची सखेद नाराजी व्यक्त करताना मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दीपांकर दत्ता आणि न्यायाधीश अभय अहुजा यांच्या खंडपिठाने मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी येत्या २३ डिसेंबरपर्यंतची मुदत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या या कठोर भुमिकेनंतर खडबडून जागे झालेले नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियाकडून पनवेल खारघरदरम्यान खड्डे बुजविण्याच्या कामास सुरूवात झाली असून पहिल्या टप्प्यातील पळस्पे ते इंदापूर या खड्डेमय राष्ट्रीय महामार्गाची खड्डे बुजवणी तातडीने सुरू केली जाणार असल्याचे यावेळी नियोजनबध्द कार्यक्रमाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. याचिकाकर्ते चिपळूण येथील अॅड.ओवेस पेचकर यांनी सातत्याने न्यायालयीन लढाईद्वारे जनतेच्या या समस्येबाबत पाठपुरावा केला असून या जनहितार्थ याचिकेवरील सुनावणीतून ४ जानेवारीला खड्डे बुजविण्याबाबतच्या कामातील प्रगतीचा अहवालदेखील सरकारने खंडपिठाला सादर करण्याचे आदेश यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश दीपांकर दत्ता यांनी दिले.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ चे आता क्रमांक ६६ असे स्वरूप आले असले तरी पनवेल ते झाराप पत्रादेवी अशा ४५० कि.मी. लांबीच्या महामार्गाचे काम गेल्या २०११ पासून सुरू होऊनही पूर्णत्वास गेलेले नाही. यासंदर्भात चिपळूण येथील विधीज्ञ अॅड.ओवेस पेचकर यांनी सातत्याने आतापर्यंत केलेल्या न्यायालयीन पाठपुराव्याअंती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सुप्रीम रोडवेज प्रायव्हेट लि. या कंपनीकडून पनवेल ते इंदापूर हे काम काढून घेतले. मात्र, यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयामध्ये यासंदर्भातील वाद गेल्याने या टप्प्याचे काम रखडले. परिणामी, अनेक ठिकाणी खड्डे पडून रस्त्याच्या दूरवस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढू लागले. या सुनावणीदरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेतली जाईल असा सज्जड इशाराही दिला होता. मात्र, तरीही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ७ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रतिज्ञापत्र सादर करीत खड्डे बुजविल्याचा दावा केला. यामुळे जनहितार्थ याचिकाकर्ते अॅड.ओवेस पेचकर यांनी राष्ट्रीय



महामार्ग प्राधिकरणाचा खोटेपणा उघड करताना नादवली, गोडसई, पाटणसई आणि सुकेळी खिंडीतील खड्ड्यांचे जिओटॅग फोटो काढून प्रतिज्ञापत्रासोबत जोडले. सोमवार, दि.१७ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या सुनावणीमध्ये अॅड.पेचकर यांनी मांडलेल्या वस्तुस्थितीची दखल घेत मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या खड्ड्यांबाबत नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियाला येत्या २३ डिसेंबरपर्यंतची मुदत मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी दिली. या जनहित याचिकेच्या सुनावणीतून ४ जानेवारी २०२३पर्यंत खड्डे बुजविण्याबाबतच्या कामातील प्रगतीचा अहवालदेखील सरकारने खंडपिठाला सादर करण्याचे आदेश दिल्याने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला खडबडून जाग आल्याचे दिसून येत आहे. रायगड जिल्ह्यात पनवेल ते इंदापूर हा पहिला टप्पा असून त्यानंतर इंदापूर ते माणगांव तालुक्यातील वडपाले आणि महाड तालुक्यातील वीर ते पोलादपूर तालुक्यातील भोगाव खुर्द असा रायगड जिल्ह्यातील दुसरा टप्पा गृहित धरण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात माणगाव येथे बायपास रोडची तरतूद असून दुसऱ्या टप्प्यात पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटादरम्यान भुयारी मार्गाची तरतूद समाविष्ट करण्यात आली. रायगड जिल्ह्यात इंदापूर ते वडपाले (माणगाव बायपास प्रस्तावित) २४ कि.मी., वीर ते भोगाव खुर्द ४० कि.मी., भोगाव खुर्द ते खवटी १४ कि.मी. (रत्नागिरी ता. खेड) ५०० कोटी रूपये अंदाजे खर्च (१.७ कि.मी भुयारी मार्ग),तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील ४४ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ५७९ कोटी रूपये, चिपळूण तालुक्यातील ३८ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ६७० कोटी रूपये, संगमेश्वर तालुक्यातील ४० कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ५९२ कोटी रूपये (आरवली आणि सोनवी), रत्नागिरी ते लांजा ५१ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ८२६ कोटी रूपये, राजा-पूर तालुक्यातील ३५ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ६६० कोटी रूपये (राजापूर आणि वाकेड), याखेरिज, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील ३८ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ४५० कोटी रूपये (बेलना व पियाली), कुडाळ तालुक्यातील ४४ कि.मी. रस्ता चौपदरीकरण अंदाजे खर्च ५७९ कोटी रूपये (गड, बन्सल आणि पिडवल),असे हे सात भाग ढोबळमानाने तयार करण्यात आले असून केंद्रसरकारकडून चौपदरीकरणाच्या उर्वरित कामासाठी ३८०० कोटी रूपयांच्या खर्चाची तरतूद झाली होती. मात्र, या तरतूदीमध्ये प्रचंड वाढ करण्याची अपरिहार्यता निर्माण झाली आहे.

इंदापूर ते माणगांव तालुक्यातील वडपाले सुमारे ३ कि.मी.हून अधिक रस्त्याचे रूंदीकरण हे महामार्गाच्या दूतर्फा आणि मध्यभागी वृक्षारोपणाच्या वन विभागाच्या अटीमुळे रखडले असून त्यासंदर्भात वनविभागाने १५ कोटी ९१ लाख ४०,५१६ रूपये जमा करण्यास सांगितले. मात्र, ही रक्कम राज्यसरकारने भरावयाची अथवा केंद्रसरकारने याबाबत वाद सुरू झाल्याने न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आणि ऑक्टोबर २०२२ मध्ये सदरची रक्कम वनविभागाला केंद्रसरकारमार्फत प्राप्त झाल्यानंतर १४ नोव्हेंबर २०२२ रोजी याठिकाणी रस्त्याच्या कामाची परवानगी वनविभागाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिली.

जनहित याचिकाकर्ते अॅड.ओवेस पेचकर यांनी प्रतिज्ञापत्रासोबत जोडलेल्या छायाचित्रांमुळे नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियाने खड्डे बुजविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचे निर्देश देताना आरामदायी रस्त्यावरून वाहन चालविताना खड्डेमुक्त समतल केलेला महामार्ग होण्यासाठी २३ डिसेंबर २०२२ ही अंतिम मुदत देत असल्याचे आदेश देऊन पुढील वर्षात ४ जानेवारी २०२३ रोजी महामार्गावरील खड्डे बुजविण्याच्या कामाचा स्थिती अहवालही सादर करण्याची आवश्यकता मुंबई उच्च न्यायालयाने व्यक्त केली आहे.

# संक्षिप्त...

## अवैध पार्किंगमुळे नागरिकांना होतोय वाहतुककोंडीचा त्रास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा सेक्टर ९ मध्ये अवैधरित्या रोडवरच टेम्पो उभा करून वाहतूक कोंडी केल्याप्रकरणी तळोजा पोलिस स्टेशन ठाण्यात टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पनवेल, तळोजा, नवी मुंबई, उरण परिसरामध्ये वाहतूककोंडीची समस्या गंभीर होत आहे. अनेक वाहन चालक रोडवरच वाहने उभी करून वाहतूककोंडीत भर टाकत आहेत. तळोजा सेक्टर ९ मध्ये एमएच ०१ बीआर १५६० हा टेम्पो रोडवरच उभा केला होता. तळोजा पोलिस स्टेशन पथकाच्या हा प्रकार निदर्शनास येताच त्यांनी संबंधित टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## फुटपाथवर आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील सूर्या गेस्ट हाऊससमोरील फुटपाथवर एका अंदाजे ६० ते ६५ वर्षीय इसमाचा बेवारस मृतदेह आढळला असून पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे.

पनवेल शहरातील सूर्या गेस्ट हाऊससमोरील फुटपाथवर एका अंदाजे ६० ते ६५ वर्षीय इसमाचा बेवारस मृतदेह आढळला आहे. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे क्र ०२२-२७४५२३३३ किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत शेंडगे यांच्याशी संपर्क साधावा.

## ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील मुळेखंड, तेलीपाडा, कुंभारवाडा व कोळीवाडा आणि परिसरातील ज्येष्ठ नागरीक मंडळाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे वर्धापन दिन मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला.

यावेळी जेष्ठ नागरिक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्याध्यक्ष अनंत लक्ष्मण पाटील, अध्यक्ष, प्रकाश पांडुरंग म्हात्रे, सचिव भालचंद्र जनार्दन म्हात्रे, सह सचिव परशुराम बुधाजी पाटील, खजिनदार ईश्वर बाळकृष्ण म्हात्रे, रामचंद्र भाई म्हात्रे, सुभाष दामोदर गुरव, गजानन हरी म्हात्रे, रमेश रामचंद्र म्हात्रे, हरिश्चंद्र दत्तू म्हात्रे आदींनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

यानिमित्ताने सत्यनारायणाची पूजा ही आयोजित करण्यात आली होती. यावेळी मंडळाच्या नूतन कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## राष्ट्रवादी काँग्रेसला धक्का; नगराध्यक्षा गीता पालरेचा यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

गेल्या अनेक दिवस सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यामध्ये चर्चेला उधाण आले होते की गीता पारलेचा यांचा भाजपमध्ये प्रवेश झाला आहे. परंतु आज दिनांक २८ नोव्हेंबर रोजी पाली नगरपंचायतीच्या पहिल्या नगराध्यक्षा, माजी जिल्हा परिषद सदस्या, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या गीता पालरेचा यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश झाला.



मुंबई भाजपा प्रदेश कार्यालयात सकाळी ११ वाजता भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम, अन्न आणि नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रवींद्र पाटील, दक्षिण रायगड उपजिल्हाध्यक्ष राजेश मपारा यांच्या उपस्थित गीता पालरेचा यांनी असंख्य कार्यकर्त्यांसोबत भाजपा, मुंबई कार्यालय येथे जाहीर प्रवेश केला.

राष्ट्रवादी काँग्रेस मधून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या गीता पालरेचा यांनी जिल्हा परिषद सदस्या व त्यानंतर पाली नगरपंचायतीच्या पहिल्या नगराध्यक्षा म्हणून प्रतिनिधित्व केले आहे. तसेच सुधागड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी, पालीतील नळ पाणी योजना, सुधागड तालुक्यातील वाड्या-पाड्यातील रस्ते, असंख्य गणेश भक्तांसाठी सोयी सुविधा पुरवणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, तरुणांना शिक्षणाच्या सोयी पुरवणे यासारख्या मागण्यांसाठी गीता पारलेचा यांनी घड्याळ सोडून हातात कमळ घेतलेले आहे. या भाजपा प्रवेशामुळे राजकीय गोटात खळबळ उडाली आहे. गीता पालरेचा यांच्या पक्ष प्रवेशामुळे दक्षिण रायगड जिल्ह्यामध्ये भाजपाला मोठी ताकद मिळाली आहे.

यावेळी भारतीय जनता पार्टी दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, राजेश मपारा, भाजपा दक्षिण रायगड जिल्हा माजी अध्यक्ष महेश मोहीते, भाजपा सुधागड तालुका अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर, रमेश साळुंखे, अभिजीत चांदोरकर, राजेश कानडे, सुशील शिंदे, प्रकाश आवसकर, मिलिंद देशमुख, प्रदीप (दादू) गोळे, सागर मिसाळ, दिनेश काटकर, संजय घोसाळकर, सुधाकर मोरे, शेखर राऊत यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपा मध्ये प्रवेश केला.

## गुंडगे येथील मोफत आरोग्य शिबिरात ३५४ जणांची तपासणी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील गुंडगे विभागातील नगरसेविका वैशाली मोरे व राईट टु लिव्ह संस्थेच्या वतीने अंबरनाथ येथील विजय मल्टिस्पेशालिस्ट हॉस्पिटलच्या सहकार्याने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३५४ रुग्णांची तपासणी करण्यात आली तर २७६ जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

गुंडगे येथील बुद्ध विहाराच्या सभागृहात मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन शरद मोरे यांचे हस्ते दीप प्रज्वलन प्रज्वलित करून करण्यात आले. याप्रसंगी नगरसेविका वैशाली मोरे, राईट टु लिव्ह चे अध्यक्ष बासिल जैलानी, माजी नगरसेवक दीपक मोरे, अरविंद मोरे, उद्य-ोजक अजय पाल, सुरज यादव, सोमनाथ चव्हाण, डॉ. हसन शेख, आरोग्य मित्र निशा गोडबोले आदी उपस्थित होते. या शिबिरात मधुमेह तपासणी, ईसीजी तपासणी, रक्तदाब तपासणी, सर्वसाधारण तपासणी करण्यात आली. यावेळी ३५४ जणांनी आपली तपासणी करून घेतली. तर तपासणी केलेल्या २७६ जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. या शिबिरास माजी नगराध्यक्षा सुनंदा कांगणे, सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी, मनोज गायकवाड, किशोर जाधव, उद्योजक विजय पाल, दिनेश वाघमारे, बॉबी वाघमारे आदींनी शिबिरास भेट दिली. अनंत कोरी, मंगेश गायकवाड, जॅकी भालेराव, शबाब टिवाले, राफत बागवान, शैलेश घोडके, दिपक भोयर, मनीष मोरे, साहील मोरे, रोहन मोरे, भुषण मोरे, बंटी कांबळे आदींनी शिबिर यशस्वी करण्यास मेहनत घेतली.

## पनवेल तालुक्यातील आदिवासी वाड्यांवर मतदान नोंदणी आणि जातीच्या दाखल्यांचे वाटप

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

प्र.कोकण विभागीय आयुक्त तथा रायगड जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आदिवासी समाजासाठी सुरू असलेल्या सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत उपविभागीय अधिकारी पनवेल राहुल मुंडके, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती शशिकला अहिरराव आणि पनवेल महसूल विभाग यांच्या सहकार्याने उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून (रविवार,दि.२७ नोव्हेंबर २०२२) रोजी पनवेल तालुक्यातील पोयांजे विभागातील पोयांजे कातकरी वाडी, भेरले वाडी, खानावले वाडी, पाली बुद्रुक वाडी, भिंगार वाडी आणि इतर आदिवासी लोकांना जातीच्या दाखल्यांचे वाटप तसेच सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत १८ वर्ष पूर्ण झालेल्यांचे मतदार नोंदणी अर्ज भरून घेतले आणि मतदानासाठी आवश्यक इतर नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली.

यावेळी उरण सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.राजेंद्र मढवी यांनी प्रभारी कोकण विभागीय आयुक्त तथा रायगड जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, पन-वेल प्रांताधिकारी राहुल मुंडके, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती शशिकला अहिरराव, पनवेल तहसिलदार विजय तळेकर तसेच महसूल विभाग आणि आदिवासी विकास प्रकल्प पेण या कार्यालयातील सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमास तहसिलदार पन-वेल विजय तळेकर, नायब तहसिलदार श्री.नाईक, मंडळ अधिकारी प्रभाकर नाईक, तलाठी श्रीमती सावंत, कोतवाल प्रकाश पडवळ, योगेश पाटील हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी पोयांजे ग्रामपंचायत सरपंच, अंगणवाडी सेविका यांचे विशेष सहकार्य लाभले.

## संभे ते आळंदी पायी दिंडी वारी दिंडी सोहळ्याची भक्तीमय सांगता

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

गेली २२ वर्षांची यशस्वी परंपरा राखत याही वर्षी रोहे तालुक्यातील संभे ते आळंदी संपन्न झालेल्या पायी दिंडी सोहळ्याची सांगता समारंभ संभे येथे मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न करण्यात आला.

शनि.दि.१२ नोव्हें.ते गुरू.दि.२४ नोव्हें. या कालावधीत सदर दिंडी सौहळा संपन्न करण्यात आला. स्वा. सु.नि.अलिबागकरबाबा, गोपाळबाबा वाजे यांच्या कृपाशिर्वादाने व रायगड भूषण ह.भ.प.नारायण महाराज दहिंबेकर व नारायणमहाराज महाबळे यांच्या संकल्पनेने संपन्न झालेल्या या दिंडी सोहळ्यात दैनंदिन काकड आरती, नामस्मरण, प्रवचन, हरिपाठ व रात्रौ.हरिकिर्तनरुपी सेवा आदी कार्यक्रम संपन्न करण्यात आले. तर या दिंडी सोहळ्याचे सांगता समारंभ प्रसंगी हरिपाठ, प्रवचन, महाप्रसाद व ह.भ.प.रूपेश महाराज शेळके यांची हरिकिर्तनरूपी सेवा आदी धार्मिक कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न आले. या सोहळ्याचे यशस्वीतेसाठी अध्यक्ष तुकाराम बांदल, उपाध्यक्ष अनंत सानप, सेक्रेटरी पांडुरंग सानप, गणेश नलावडे, खजिनदार जितेंद्र दहिंबेकर, दत्ता तेलंगे, रमेश बर्डे, परशुराम कापसे, संदेश सानप, गणेश दिघे, गणेश कुर्ले, चेतन ओंबले, विलास दहिंबेकर आदि पदाधिकाऱ्यांसह सर्व सल्लागार मंडळ तसेच श्री.संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सत्संग वारकरी सेवा मंडळ, संभे व वीर हनुमान क्रीडा मंडळ संभे यांनी मोलाचे सहकार्य केले.

## वाहतूक कोंडी करून कपडे विक्री करणाऱ्या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर परिसरात रोडवर वाहतूक कोंडी करून कपडे विक्री करणाऱ्या इसमाविरुद्ध खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर सेक्टर ३० मध्ये रोडवर वाहन उभे करून कपडे विक्री करणाऱ्या समीर पटेल यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोडवर वाहतूक कोंडी करून सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण केल्याप्रकरणी समीर पटेल यांच्यावर गुन्हा दाखल केला असून अशाप्रकारे कपड्यांची विक्री करणे चुकीचे असून सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केल्यामुळे पोलिसांकडून ही कारवाई करण्यात आली आहे.

## ...अखेर २५ जानेवारी २०२३ पर्यंत खालापूर उपजिल्हा रूग्णालयाचा प्रश्न मार्गी लागणार

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर उपजिल्हा रूग्णालय लवकरात लवकर उभारण्यात यावे, या मागणीसह हाळ खुर्द गावातील मुस्लिम व आदिवासी समाजांना दफनभूमी, उर्दू शाळा इमारत दुरूस्ती आदी विविध मागण्यांसाठी जेष्ठ पत्रकार पैलवान हनुमंतराव ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली १ डिसेंबरपासून आमरण उपोषण करण्यात येणार होते. मात्र, ७३ वर्षीय जेष्ठ पत्रकाराच्या आंदोलनाची दखल घेत खालापूर तहसीलदार अय्युब तांबोळी यांनी खोपोली नगर परिषद, पीडबल्यूडी, पाटबंधारे, वन विभाग, महावितरण, पंचायत समिती शिक्षण विभाग आदी विविध विभागांच्या अधिकारी व आंदोलनकर्त्यांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करण्यात आल्याने व आगामी २५ जानेवारी २०२३ पर्यंत खालापूर उपजिल्हा रूग्णालयाचा प्रश्न मार्गी लावण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आल्याने सदर आंदोलन दि. २६ जानेवारी २०२३ पर्यंत स्थगित करण्यात आले आहे.



या बैठकीत खालापूर तालुक्यातील दहिवली तर्फे बोरेटी पालीफाटा पेट्रोल पंपाजवळ असलेल्या आरक्षित जागेवर प्रलंबित शासकीय रूग्णालयाचे काम त्वरीत सुरू करण्यात यावे, खोपोली नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मधील सुभाषनगर येथे माळीण व तळईसारखी घटना घडू नये, यासाठी संरक्षण भिंत बांधण्यात यावी, ताकई रोड आर.सी.सी. काम त्वरीत करण्यात यावे, शिळफाटा येथील बंद असलेले ट्रामा सेंटर (दव-ाखाना) त्वरित चालू करण्यात यावे, अशा विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. या बैठकीला खोपोली नगर परिषद मुख्याधिकारी अनुप दुरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे कर्जत विधानसभा संपर्क प्रमुख तथा खोपोली शहर प्रमुख सुनील गोटीराम पाटील, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा पोलीस मित्र संघटना महाराष्ट्र राज्य महासचिव फिरोज पिंजारी, पोलीस मित्र संघटना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष किशोर शितोळे, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन महाराष्ट्र राज्य महासचिव तथा पोलिस मित्र संघटना रायगड जिल्हा महासचिव खलील सुर्वे, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन महाराष्ट्र राज्य सचिव तथा पोलीस मित्र संघटना रायगड जिल्हा संघटक नरेश जाधव, पोलीस मित्र संघटना कोकण प्रदेश अध्यक्ष रमेश कदम, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन रायगड जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते गोपीनाथ सोनवणे, रफिक जलगांवकर, मुश्ताक मुल्ला, वहाब करजीकर, सईद सुर्वे, हनीफ जलगांवकर, ज़िशान जळगावकर, सतिश रावळ, रायगड संघर्ष समितीचे अनंता शिंदे, दत्ता ओव्हाळ, पाडुरंग मोरे आदी उपस्थित होते.